स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच. डी.

पूर्व संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय : **महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत नागरी समाजाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास**
(विशेष संदर्भ : मराठवाडा जनता विकास परिषद)

संशोधक : **नागेश देवराव टिपरसे**

मोबाईल नंबर : ७२४९०४२४००

ई- मेल : nageshtiparse@gmial.com

जात : **अनुसुचित जमाती**

मार्गदर्शक : **प्रा. डॉ. रामचंद्र गायकवाड**

मोबाईल नंबर : ९१६८५८७५५५

ई- मेल : rjgaikwad358@gmail.com

संशोधनाचा विषय

महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत नागरी समाजाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ : मराठवाडा जनता विकास परिषद)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच. डी.

पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

नागेश देवराव टिपरसे

एम. ए. राज्यशास्त्र (नेट, सेट)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. रामचंद्र गायकवाड

राज्यशास्त्र विभाग

पानसरे महाविद्यालय अर्जापूर

ता. बिलोली जि. नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

ऑगस्ट– २०२३

महाराष्ट्राच्या विकास प्रकियेत नागरी समाजाची भूमिका चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ : मराठवाडा जनता विकास परिषद)

प्रस्तावना :

०१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. १९६० पूर्वीच्या महाराष्ट्र पहावयाचा झाल्यास आपणास ब्रिटिश भारताकडे पहावे लागते. कारण तत्कालीन परिस्थितीत भारताचे दोन भाग होते. १. ब्रिटिश भारत, २. संस्थानिकांचा भारत. स्वातंत्र्य पूर्वकाळात महाराष्ट्राचा काही भाग हा संस्थानिकांच्या भारतात समाविष्ट होता.

ब्रिटिशकालीन महाराष्ट्राचा विचार करावयाचे झाल्यास १८५८ पासून भारतात राणीचा प्रत्यक्ष राज्यकारभार सुरू झाल्यानंतर प्रशासनावर आपली पकड मजबूत ठेवण्यासाठी आपल्या सोयीप्रमाणे त्यांनी स्थापन केलेल्या भारताच्या प्रशासन व्यवस्थेला राबविले. कधी फाळणी करून तर कधी दोन किंवा तीन भाषिकांचे कडबोळे एकत्र करून प्रशासनाचे एकत्रीकरण केले होते. याचाच एक भाग म्हणून सिंध, गुजरात, सौराष्ट्र, मुंबई यांना एकत्र कोंबून एक प्रांत तर कधी सिंध वेगळा करून गुजरात, कच्छ, सौराष्ट्र असा महाराष्ट्राचा मुंबई प्रांत तयार केला. स्वातंत्र्यपूर्वीचा महाराष्ट्र हा 'मुंबई इलाखा' या नावाने ओळखला जात असे. सिंधी, गुजराथी, मराठी व काही कानडी अशा चार भाषांचा 'मुंबई इलाखाच' होता. तर 'वऱ्हाड' हा मध्यप्रांत जोडून हिंदी-मराठी 'इलाखा' अशी खिचडी होती. अशीच फोडाफोड इतर प्रांताचीही करण्यात आली होती. एकंदरीत स्वातंत्र्यापूर्वीच्या प्रांतनिर्मितीचा विचार हा तत्वहीन होता. कारण यात संलग्नता, भाषिक एकता, आर्थिक विकास, सांस्कृतिक व सामाजिक हितसंबंधांच्या सर्वच घटकांची उपेक्षा झालेली होती.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या घोषणेप्रमाणे भारतात संस्थानिकांचे झालेले सामिलीकरण हा संस्थानाच्या विलिनीकरणाच्या प्रक्रियेतील पहिला टप्पा १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच संपला होता. यावेळी बहूतांश संस्थाने भारतात सामील झाली. परंतु एवढ्याने एकसंघीय भारताच्या निर्मितीचे स्वप्न साकार होणारे नव्हते. सामीलीकरणाच्या करारपत्रावर आणि 'जैसे थे' करार पत्रावर, स्वाक्षऱ्या करून संस्थानिकांनी भारत सरकारचे सार्वभौमत्व तत्वतः मान्य केले आणि संरक्षण, परराष्ट्रीय संबंध आणि दळणवळणाची साधने याबाबतचे अधिकार भारत सरकारच्या हाती सोपविले. तरी संस्थानाचे अस्तित्व मात्र कायम होते. भारताला खऱ्या अर्थाने एकसंघीय बनवायचे असेल तर संस्थानाच्या

सीमा रद्द करून तेथील प्रजेला भारतीय नागरिकांचा दर्जा देणे आवश्यक होते. सामीलीकरण म्हणजे विलिनीकरण नव्हे, याची जाणीव भारत सरकारला होती म्हणून, संस्थानिकांच्या संपूर्ण विलिनीकरणाच्या दृष्टीने भारत सरकारने १९४७ नंतर महत्त्वाचे पाऊल उचलले आणि विलिनीकरणाचे उद्दिष्ट सिद्धीस नेले. सामीलीकरणाच्या प्रक्रियेप्रमाणे विलिनीकरणाची प्रक्रिया ही सुरळीतपणे व निर्धीकपणे पार पडली. परंतु ही प्रक्रिया सुरू असताना जुनागढ, हैद्राबाद व काश्मीरच्या संस्थानिकांनी भारतात सामील होण्यास नकार दिला. सध्याच्या महाराष्ट्रातील मराठवाडा हा प्रांत हैद्राबाद संस्थानात होता. हे संस्थान भारतात विलिन होणार नाही हे समजताच या प्रांतातील लोकांनी स्वामी रामानंदतीर्थ यांच्या नेतृत्वाखाली लोकलढा किंवा लोकांचे आंदोलन, उभारून भारत सरकारच्या सहकार्याने हा प्रांत पूर्वीच्या मुंबई प्रांतास १७ सप्टेंबर १९४८ रोजी जोडला गेला.

स्वातंत्र्यपूर्व काळात १९३७-३८ मध्ये काँग्रेसने भाषावर प्रांतरचनेचे आश्वासन दिले पण स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने आपली भूमिका बदलली लोकांच्यामध्ये यामुळे असंतोष निर्माण झाला. १९०५ मध्ये बंगालमध्ये तर १९१७ मध्ये मद्रासप्रांतात भाषावर प्रांताची मागणी होत होतीच. भाषांवर प्रांताची मागणी तशी १८९५ पासून सुरू होती. १९३६ मध्ये मधुसुदन दास यांच्या प्रयत्नामुळे भाषेवर आधारित स्वतंत्र ओरिसाची निर्मिती बिहार प्रांतातून करण्यात आली होती. १९२० च्या काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात व १९२८ च्या नेहरु अहवालात भाषावर प्रांतरचनेच्या तत्वांचा स्विकार केला गेला. तसेच १९४५-४६ च्या निवडणूक जाहिरनाम्यातसुद्धा काँग्रेसने भाषावर प्रांतरचनेचा स्वीकार केला होता. परंतु स्वातंत्र्यानंतर फाळणीची झळ पाहिलेल्या नेहरुंना धक्का बसला. त्यामुळे नेहरु भाषांवर प्रांतरचनेचा धोका पत्कारायला तयार नव्हते. १९५० साली भारताच्या राज्यघटनेत भारताचे वर्गीकरण अ, ब, क, ड, अशा चार भागात करण्यात आले. ही वर्गवारी यशस्वी न झाल्याने शासनाने राज्यपुनर्रचना करण्यासाठी विविध आयोग तेथून लोकांच्या भावना जाणून घेऊन अहवाल सादर करण्यास सांगितले. न्या. एस. के. धार आयोग १९४८ जेव्हीपी समिती १९४९ नेमले. याचा परिणाम म्हणून १९५३ मध्ये मद्रास प्रांतातील १६ तेलगु भाषिक जिल्ह्याचा आंध्रप्रदेश राज्य पोट्टी श्रीरामलू यांच्या मरणांतिक उपोषणामुळे मिळाले. तेव्हा इतर प्रांतातून भाषावर प्रांताची मागणी तीव्र स्वरूपाने पुढे आल्यामुळे राज्यपुनर्रचना आयोगाची १९५३ मध्ये स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या शिफारशीनुसार ३१ ऑगस्ट १९५६ रोजी राज्यपुनर्रचना कायदा १९५५ संमत करण्यात आला व एक नोव्हेंबर १९५६ पासून त्याची अमलबजावणी करण्यात

आली. या आयोगाने संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करून कन्नड भाषिक जिल्हे वगळून मराठवाडा, सौराष्ट्र, गुजराथी प्रदेशासह मुंबई राजधानी असलेल्या द्वैभाषिक राज्याची शिफारस केली. यास मराठी भाषिक लोकांनी तीव्र आक्षेप घेतला. तेव्हा मराठी भाषिक लोकांच्या गळी त्रिराज्य योजना घालण्याचा प्रयत्न झाला. ते यशस्वी झाले नाही. नंतर मोठ्या महाप्रयासाने १ नोव्हेंबर १९५६ रोजी महाद्वैभाषिक राज्य अस्तित्वात आले. या राज्यात मराठवाड्याचाही समावेश होता. विदर्भाने २८ सप्टेंबर १९५६च्या नागपूर कराराने संयुक्त महाराष्ट्रात विदर्भाचा समावेश करण्यात आला. त्यामुळे विदर्भाला उपराजधानी, उच्चन्यायालयाचे खंडपीठ व विधीमंडळाचे एक अधिवेशन मिळाले होते. तर मराठवाडा विनाअट सामील झाला होता की जो मगासलेला होता या राज्याचे पहिले मुख्यमंत्री काँग्रेसचे नेते यशवंतराव चव्हाण होते. यावेळी भारतात राज्यघटनेचे राज्य अस्तित्वात आल्यामुळे निवडणुकांच्या माध्यमातून बहुमताचे शासन राज्याराज्यात स्थापन होत होते. या बहूमताच्या राजकारणात काही भागात काँग्रेस पिच्छाडीवर जात होती. त्या राजकारणाचा भाग म्हणून १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्यात आले. ज्या महाराष्ट्रात कोकण, खानदेश, विदर्भ, प. महाराष्ट्र, मराठवाडा व मुंबई या प्रदेशाचा समावेश करण्यात आला.

मराठवाड्याचे मागासलेपण :

मराठवाडा हैद्राबादच्या निजाम राजवटीपासून स्वतंत्र होऊन ७२ वर्ष पूर्ण होत आहेत. मागेवळून पाहताना मराठवाड्याचे मागासलेपण सहज दिसून येते. ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील प्रदेशात ज्याप्रमाणे आधुनिकतेची मूल्ये, संचार साधन, दळणवळणाचे मार्ग औद्योगीकरण आणि शिक्षण होते. ते मराठवाड्यात खूप उशिरा पोहोचले. नागपूर करारातील 'मराठवाड्याकडे खास लक्ष देण्यात येईल.' या अटीप्रमाणे मराठवाडा मागास राहिला. जमीन सुधारणा, हरितक्रांती शेतीविकास पीक पद्धतीतील नियोजन पाणीसाठे नियोजन व निर्मिती, नैसर्गिक, साधन संपत्ती, औद्योगिक विकास, या सर्व घटकांचा मराठवाड्यात अभाव आहे. याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे मजुरांचे रोजगाराच्या अभावी होणारे स्थलांतर ही तर फार मोठी समस्या होती. म्हणून १९७० च्या दशकात मराठवाडा विकास आंदोलन झाले. या माध्यमातून मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव यांच्या नेतृत्वाखाली हे विकास आंदोलन चालवले गेले. या आंदोलनातून मागासलेल्या मराठवाड्याच्या विकास प्रश्नावर आवाज उठविण्यास मदत झाली व मराठवाड्याच्या विकास प्रश्नाकडे लक्ष दिले गेले. त्यासाठी मराठवाडा जनता विकास परिषदेची स्थापना करण्यात

आली. या परिषदेच्या माध्यमातून,

१. जायकवाडी प्रकल्प त्वरेने पूर्ण करण्यात यावा.
२. मराठवाड्यातील रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्यात यावे.
३. मागास मराठवाडा प्रदेशासाठी विशेष सवलती देण्यात यावी.
४. मराठवाड्याचा विकासाचा अनुशेष.
५. वैधानिक विकास मंडळाची स्थापना.
६. मराठवाड्याच्या विकासासाठी विशेष आर्थिक तरतूद.
७. मराठवाड्यासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ.
८. उच्चन्यायालयाचे खंडपीठ याची स्थापना ह्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यात आला. शासनाकडून मराठा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी डॉ. वि.म. दांडेकर समिती स्थापन कण्यात आली.

मराठवाडा जनता विकास परिषद :

मराठवाडा जनता विकास परिषद ही खास मराठवाड्याच्या विकासासाठीच थोर स्वातंत्र्यसेनानी मा. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली १९७५ मध्ये सुरू झाली. या माध्यमातून मराठवाड्याच्या प्रश्नावर अनेक आंदोलने झाली. याचाच भाग म्हणून १९९४ मध्ये वैधानिक विकास मंडळांची स्थापना झाली. मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र यांचा समन्यायी विकास व्हावा. हा या पाठीमागचे उद्देश होता.

मराठवाडा जनता विकास परिषदेच्या माध्यमातून सिंचन शिक्षण रेल्वे आणि रोजगाराच्या प्रश्नावर आजपर्यंत आवाज उठविण्यात आला. जसे की,

१. जायकवाडीचे पाणी मराठवाड्याला ठरवून दिलेल्या तरतुदीनुसार मिळावे यासाठी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल.
२. मराठवाडा विकास मंडळाची २०२०मध्ये मुदत संपली त्याला मुदतवाढ मिळण्यासाठी आंदोलने करणे.
३. नांदेड-लातूर, नांदेड-बिदर, नांदेड-परळी, बीड नगर रेल्वे मार्ग.
४. जालना-खामगाव रेल्वे मार्ग.
५. रोटेगाव-कोपरगाव, रेल्वे प्रकल्प रखडले आहेत. या मार्गाचा पाठपुरावा करणे.
६. मराठवाडा विभाग मध्यरेल्वेला जोडणे.
७. मराठवाड्यात आय. आय. टी. संस्था स्थापन करणे.

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा देणे.

९. आणि रोजगारभिमुख व्यवसाय मराठवाड्यात स्थापन करून मराठवाड्यातील लोकांचे स्थलांतर थांबविणे अशा अनेक मागण्या लावून धरल्या आहेत.

१०. मराठी भाषेचे विद्यापीठ आंबाजोगाई येथे उभारावे.

११. काळवटी तलावाची उंची वाढविण्यात यावी.

१२. बुट्टेनाथ साठवण तलाव तातडीने बांधण्यात यावे.

१३. घाटनांदूर ते अंबाजोगाई रेल्वेमार्ग तयार करावा.

समस्या सुत्रन :

संशोधन कार्यात संशोधन समस्येला अतिशय महत्वाचे स्थान आहे. संशोधनाचे क्षेत्र कोणतेही असो यामध्ये कृषी आरोग्य सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगालिक, अवकाश, भूगर्भ, ऐतिहासिक इ. मध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्‍चित केल्याशिवाय संशोधन कार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन समस्या निवडणे आवश्यक ठरते. १९६० नंतर महाराष्ट्रात विकासाची जी प्रक्रिया राबविली गेली. ती मराठवाड्यात नियोजनबद्ध पद्धतीने अंमलात आली नाही. दळणवळणाचा अभाव व प्रशासन व राजकीय व्यक्तीची मराठवाड्याप्रति असलेली उदासिनता यामुळे मराठवाडा मागास ठरला. तेव्हा मराठवाड्यातील लोकांनीच आपल्या भागाच्या विकासाठी पुढाकार घेऊन मराठवाडा जनता विकास परिषदेची स्थापना करण्यात आली. परंतु या परिषदेच्या कार्याला म्हणावे तसे यश आले नाही. यांच्या कार्यप्रणालीत उणिवा हा त्यातील एक भाग असावा. उद्योगन्मूख नेर्तत्वाचा अभाव हाही त्यातील भाग असावा व समाजातील सर्व पातळीवरील लोकांच्या सर्वसमावेश सहभागाचा अभाव हाही एक घटक कारणीभूत असावा. या घटकांचा अभ्यास करण्याचा मानस माझा असल्यामुळे मी हा विषय पीएच. डी. संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन विषय निवडीचे महत्त्वः

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विचार करता समतोल विकास हा राज्याच्या, देशाच्या प्रगतीचे लक्षण मानले जाते. समतोल विकासाच्या अभावाने अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. नक्षलवाद, बरोजगारी, व्यसनाधिनता, असुरक्षितता ह्या प्रदेशात यातूनच उद्‌भवलेले दिसतात. म्हणून विकास प्रश्नावर चर्चा, पाठपुरावा यातून अनेक घटकांना यात सामावून घेतले

जाते. विकासापासून कोसोदूर असलेल्या घटकांना राज्याच्या मुख्य प्रवाहामध्ये सामावून घेता येते. यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. महाराष्ट्राची विकास प्रक्रिया जाणून देणे.

२. प्रादेशिक असमतोलाच्या कारणाचा शोध घेणे.

३. नागरी समाज काय व त्यांच्या भुमिकांचा अभ्यास करणे.

४. मराठवाडा विकास आंदोलनाचा अभ्यास करणे.

५. मराठवाडा जनता विकास परिषद निर्मिती मागची भूमिका अभ्यासणे.

६. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या कार्याचा व रचनेचा अभ्यास करणे.

७. मागास भागाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निश्चित केलेले गृहितकृत्य पुढीप्रमाणे मोडले आहेत.

१. महाराष्ट्राची विकास प्रक्रिया १९६० नंतर सुरू झाली आहे.

२. महाराष्ट्रात विकासाच्या बाबतीत प्रादेशिक असमतोलपणा आहे.

३. महाराष्ट्राच्या विकास प्रक्रियेत नागरी समाजाचे निर्देश निर्णय निर्धारकाला झालेले आहेत.

४. मराठवाडा इतर प्रदेशाच्या तुलनेत मागास राहिलेला आहे.

५. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी घटनात्मक तरतुदीचा अवलंब करण्यात आला आहे.

६. महाराष्ट्राच्या निर्मितीला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

७. मराठवाडाच्या मागासलेपणास या भागातील राजकीय उदासिनता व खंडीत राजकीय संस्कृती कारणीभूत ठरली आहे.

संशोधन पद्धती :

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मुलभूत संशोधन असे तीन प्रकार पडतात. व्यावहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात. त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्परांशी

पूरक असून क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारण करण्याचा असतो. उदा. वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन यांच्याशी संबंधित असते. तर मुलभूत संशोधनात एखादी घटना विचार किंवा समाजात उद्‌भवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते तसेच असे संशोधन अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थळकाळपरत्वे बदल होत असतात, त्यामुळे प्रस्तुत संशोधन मुलभूत अध्यययनाशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक, ऐतिहासिक वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक, ऐतिहासिक वर्णनात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी स्तंभालेख वर्तुळ या सांख्यिकीय अभ्यास पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

१. संशोधनाची व्याप्ती किंवा मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य मूळ उद्देशापासून भरकटत असते. प्रस्तुत संशोधन मराठवाड्याचे मागासलेपण व यासाठी अविरत प्रयत्न करण्यासाठी म्हणून मरावाडा जनता विकास परिषद यांच्या कार्याशी संबंधित आहे. तेव्हा या विकास परिषदेची रचना व कार्यपद्धती आणि मराठवाडा हा प्रस्तुत शोधप्रबंधाची व्याप्ती असणार आहे.

२. तथ्यसंकलन

प्रस्तुत संशाधेन विषय मुलभूत संशोधनात येत असल्यामुळे संशोधन कार्यासाठी माहितीची जमवाजमव करण्याच्या उद्देशाने द्वितीय स्त्रोताचा उपयोग केला आहे. यामध्ये केंछ्द्र राज्य शासना संदर्भात विविध समित्या व आयोगाचे अहवाल, शासकीय अहवाल, प्रकाशने, खाजगी संस्थाची प्रकाशने, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादींच्या उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाचा आराखडा :

संशोधनाला व्यवस्थित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधन विषयाची विभागणी पुढील प्रकरणात केलेली आहे.

१. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास.

२. मराठवाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी व त्याच्या मागासलेपणाची कारणे.

३. मराठवाडा विकासासाठी करण्यात आलेली विविध विकास आंदोलने.

४. मराठवाड्याच्या विकासात नागरी समाज म्हणून मराठवाडा जनता विकास परिषदेची भूमिका.

५. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या कार्याचे मूल्यमापन.

६. संशोधनाचा सारांश निष्कर्ष व शिफारशी.

संदर्भ ग्रंथसूची :

१. फडके, य. दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र. खंड १ ते ६.

२. पेंडसे, लालजी, संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन, मुंबई, १९६५.

३. देव, शंकरराव, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, पुणे, १९७९.

४. टिकेकर, अरूण, १९९५ सत्तांतर वर्षातील महाराष्ट्राच्या स्थितीच्या आढावा, मुंबई, १९९६.

५. गाडगीळ न. वि. पथिक खंड २, १९६४.

६. अत्रे, आचार्य, कऱ्हेचे पाणी खंड-४ व ५ मुंबई, १९६८.

७. आधुनिक भारताचा इतिहास, डॉ. कोठेकर, शांता साईनाथ प्रकाशन, नागपूर, १०.

८. हैद्राबाद विमोचन आणि विर्सजन, नरहर कुरुंदकर, रजत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५.

९. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, डॉ. एस. एस. गाठाळ, कैलास प्रकाशन, औरंगाबाद.

१०. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, अनंत भालेराव, अभंग प्रकाशन, नांदेड.

११. हैद्राबाद मुक्तिसंग्राम : माझ्या आठवणी, ज. रा. बर्दापुरकर.

संशोधक
नागेश देवराव टिपरसे
एम. ए. राज्यशास्त्र (नेट, सेट)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. रामचंद्र गायकवाड
राज्यशास्त्र विभाग
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता. बिलोली, जि. नांदेड